महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ■ २५ डिसेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १८० ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## नववर्ष स्वागताच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासन सतर्क

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई : नववर्षाचे आगमन, उत्सव आणि ३१ डिसेंबरच्या पार्श्वभूमीवर हॉटेल्स, उपाहारगृहे व खाद्य आस्थापनांमध्ये तयार होणारे अन्न स्वच्छ, सुरक्षित व निर्भेळ असणे आवश्यक आहे. यासाठी अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील रेस्टॉरंट्स, हॉटेल्स आणि खाद्य आस्थापनांची सखोल तपासणी करावी, असे निर्देश अन्न व औषध प्रशासन आणि विशेष सहाय्य विभागाचे मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिले.**



नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने हॉटेलमधील स्वच्छतेला विशेष महत्त्व असून यासंदर्भात हॉटेल व्यावसायिकांमध्ये जनजागृती व प्रबोधन करावे. तपासणीदरम्यान मुदतबाह्य कच्च्या मालाचा वापर, अन्नपदार्थांमध्ये खाद्य व अखाद्य रंगांचा वापर, तसेच स्वच्छतेच्या निकषांचे पालन होत आहे की नाही, याची काटेकोर तपासणी केली जाईल. यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाने राज्यभर मोठी मोहीम हाती घेतली असल्याचे मंत्री झिरवाळ यांनी स्पष्ट केले.

### 'स्वागत नववर्षाचं, संकल्प हॉटेल स्वच्छतेचा' उपक्रम

उत्कृष्ट हॉटेल्सना पुरस्कार व प्रोत्साहन उत्तम स्वच्छता व अन्नसुरक्षा मानकांचे पालन करणाऱ्या हॉटेल आस्थापनांना प्रोत्साहन देण्यासाठी

### हॉटेल्स व आस्थापनांमध्ये सखोल तपासणीचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांचे निर्देश

जिल्हा व राज्यस्तरावर उत्कृष्ट हॉटेल्सना पुरस्कार देण्यात येणार आहेत. जिल्हास्तरावरील पुरस्कार २६ जानेवारी २०२६ रोजी संबंधित जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या हस्ते प्रदान करण्यात येतील, तर राज्य स्तरावर उत्कृष्ट ठरलेल्या हॉटेल्सचा सन्मान मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात येणार असल्याची माहिती मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिली.

मंत्री झिरवाळ यांच्या संकल्पनेतून 'स्वागत नववर्षाचं, संकल्प हॉटेल स्वच्छतेचा' हा विशेष उपक्रम २६ डिसेंबर ते १५ जानेवारी या कालावधीत राज्यभर राबविण्यात येत आहे. या मोहिमेचा सविस्तर अहवाल मंत्री कार्यालयात सादर करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

## भिवंडीत मुंबई-नाशिक महामार्गावर वाहतूक कोंडी

### सिमेंट मिक्सर ट्रक पलटी झाल्याने वाहतूक कोंडी



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** मुंबई नाशिक महामार्गावर पडघा गांवाजवळील समृद्धी महामार्गाखालील बोगद्यात सिमेंट मिक्सर ट्रक पलटी झाल्याची घटना आज दुपारी घडली आहे.या अपघातामुळे प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती. त्यामुळे वाहन कोंडी सोडवण्यासाठी धावपळ उडाली होती. मुंबई नाशिक महामार्गावर पडघा येथे दोन ते तीन किलोमीटर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या असून महामार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती. त्यामुळे प्रवासी नागरिकांचे मोठे हाल झाले होते.वाहतूक पोलिसांकडून पलटी झालेला ट्रक क्रेनच्या साहाय्याने बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू असून महामार्गांवरील वाहतूक कोंडी सोडविण्याचे विशेष प्रयत्न वाहतूक पोलिसांकडून करण्यात आले.



**फळेगाव शेतकरी सोसायटीच्या चेरमन पदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना बाजार समितीचे सभापती रवींद्र घोडविंदे, युवा नेते दिनेश कथोरे,गणेश भोईर.**



**पळसोली शेतकरी सेवा सोसायटीच्या अध्यक्षपदी गजानन चौधरी यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना रवींद्र घोडविंदे, दिनेश कथोरे, नरेंद्र पाटील, गणेश भोईर, राजाराम चौधरी**

## प्रचार समाप्तीनंतर सर्व प्रसारमाध्यमांतील निवडणूकविषयक जाहिरातींना बंदी - राज्य निवडणूक आयुक्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या प्रचाराची मुदत 13 जानेवारी 2026 रोजी सायंकाळी 5.30 वाजता संपणार असल्याने, त्यानंतर इलेक्ट्रॉनिक आणि मुद्रित माध्यमांसह अन्य कुठल्याही प्रसारमाध्यमांद्वारे निवडणूकविषयक जाहिराती प्रसिद्ध किंवा प्रसारित करता येणार नाहीत, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली.**

राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची महानगरपालिकेच्या निवडणुकांसंदर्भात बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. आयोगाचे सचिव सुरेश काकाणी, विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी आणि अधिकारी यावेळी उपस्थित होते. श्री. वाघमारे यांनी सांगितले की, महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी 15 जानेवारी 2026 रोजी सकाळी 7.30 ते सायंकाळी 5.30 या वेळेत मतदान होणार आहे. संबंधित अधिनियमातील तरतुदींनुसार मतदान समाप्तीच्या 48 तास आधी म्हणजे 13 जानेवारी 2026 रोजी सायंकाळी 5.30 वाजता जाहीर प्रचाराची मुदत संपेल. त्यानंतर प्रसारमाध्यमांतून कुठल्याही प्रकारची जाहिरात प्रसिद्ध अथवा प्रसारित करता येणार नाही. त्यामुळे जाहीर प्रचाराच्या समाप्तीनंतर मुद्रित माध्यमांच्या जाहिरातीच्या पूर्वप्रमाणनाचा किंवा परवानगीचा प्रश्न उद्‌भवत नाही. यासंदर्भातील सविस्तर बाबी राज्य निवडणूक आयोगाच्या 9 ऑक्टोबर 2025 रोजीच्या 'निवडणुकांच्या प्रयोजनार्थ प्रसारमाध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश, 2025'मध्ये नमूद केल्या आहेत.

श्री. काकाणी यांनी याप्रसंगी तपशिलवार सादरीकरण केले. त्यांनी सांगितले की, इच्छूक उमेदवाराचे नाव संबंधित महानगरपालिकेच्या मतदार यादीत असणे आवश्यक आहे; परंतु सूचक आणि अनुमोदकाचे नाव मात्र उमेदवार निवडणूक लढवत असलेल्याच प्रभागात असणे आवश्यक आहे. पक्षाच्या उमेदवारास आणि अपक्ष उमेदवारासही प्रत्येकी एक सूचक आणि एका अनुमोदकाची आवश्यकता असते. एखादा उमेदवार एकापेक्षा जास्त प्रभागात नामनिर्देशनपत्र भरून शकतात; परंतु एका उमेदवारास एका प्रभागातील एकाच जागेसाठी निवडणूक लढविता येते आणि एका जागेसाठी जास्तीत जास्त चार नामनिर्देशनपत्रे दाखल करता येतात.

## ठाकरे बंधुंकडून युतीची अधिकृत घोषणा



दै. ठाणे जीवनदीप वार्ता


**मुंबई :** विधानसभा निवडणुकीवेळी भाजपने 'बटेंगे तो कटेंगे'चा अपप्रचार केला होता. यामुळेच मराठी माणसांना आवाहन करतोय आता जर का चुकाल तर संपाल हे लक्षात ठेवा. आता जर का फुटाल तर पूर्णपणे संपून जाल. म्हणूनच 'तुटू नका, फुटू नका आणि मराठीचा वसा टाकू नका', असे आवाहन शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मराठी जनांना केले. मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी शिवसेना- मनसे युतीची घोषणा करतानाच मुंबईचा महापौर मराठीच होईल आणि तो आमचाच होईल, असा निर्धार मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांनी केला.

एकत्र आलो ते एकत्र राहण्यासाठी' ही घोषणा उद्धव ठाकरे यांनी ५ जुलैच्या वरळीतील सभेत केली होती. यानुसार ठाकरे बंधू एकत्र आले व त्यांनी मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी युतीची घोषणा केली.

## जीवनदीप कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण व स्नेहसंमेलन समारंभ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**गोवेली :** जीवनदीप महाविद्यालयाच्या कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दिनांक २६- १२- २०२५ रोजी पार पडला. शैक्षणिक वर्षात उत्कृष्ट कामगिरी करणारे गुणवंत विद्यार्थी विविध क्षेत्रातील मान्यवर पाहुणे कला , क्रीडा, पर्यावरण क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे पार पडला. सर्वप्रथम गणरायाच्या चरणी नतमस्तक होत दीपप्रज्वलन करीत सदर कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली या कार्यक्रम प्रसंगी उपस्थित मा. श्री. पंकज गिरी (पोलीस निरीक्षक मांडा टिटवाळा ) मा. श्री. डॉ. प्रफुल्ल विशे(वरिष्ठ व्यवस्थापक



आरोग्य विभाग हिंदुस्तान पेट्रोलियम कार्पोरेशन ) मा. श्री. दिनेश कथोरे (युवा नेता भाजपा) तसेच सुप्रसिद्ध मुरबाडी बाई प्राची पाटील, बॉलीवूड स्टंट डायरेक्टर मा. श्री. चिता शेट्टी, डॉ. आशा मुंजाळ (तालुका वैद्यकीय अधिकारी) मा. श्री सुरेश गायकर (आदर्श शेतकरी) डॉ. प्रतीक्षा घोडविंडे, पत्रकार. संजय कांबळे इ क्षेत्रातील गुणवंत मान्यवर सदर कार्यक्रम प्रसंगी उपस्थित होते; संस्थेचे अध्यक्ष. मा. श्री. रविंद्र घोडविंदे यांनी सदर प्रमुख अतिथी मान्यवरांचा यथोचित सन्मान केला. माननीय डॉ.प्रफुल्ल विशे यांच्या प्रयत्नातून महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना मिळालेली HPCL ची शिष्यवृत्ती चा लाभ हे लक्षात घेत धनादेश देत त्यांचा सत्कार करण्यात आला.

महाविद्यालयाचे कला, क्रीडा, शैक्षणिक क्षेत्रात अव्वल आलेले अशा सर्व विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र व पदक देऊन सन्मान करण्यात आला. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना खूप मोलाचे मार्गदर्शन केले यामध्ये आपण आपलं भवितव्य कशाप्रकारे घडवावं, पर्यावरणाला कसे जोपासावे इत्यादी विषयांवर मान्यवरांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कार्यक्रमाचे आकर्षण असलेली सुप्रसिद्ध मुरबाडी बाई प्राची पाटील यांनी आपल्या गोड मुरबाडी बोलीने प्रेक्षकांना खिळवून ठेवलं. यानंतर सर्व विद्यार्थ्यांच्या आवडत्या सांस्कृतिक कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली यामध्ये नृत्य, मोनो ऍक्ट व विविध रिमिक्स मराठी, हिंदी गाण्यांवर नृत्य करत विद्यार्थ्यांनी आपली कलाकारी सादर केली. सदर कार्यक्रम प्रसंगी संस्थेचे संचालक. प्रशांत घोडविंदे, प्राचार्य. डॉ.अशोक वाघ, उपप्राचार्य. हरेंद्र सोष्टे, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य. प्रकाश रोहणे व प्राध्यापक वर्ग उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागप्रमुख. सतीश लकडे, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा. नरेश टेंभे, प्रा. दिनेश धनगर प्रा. जया देशमुख यांनी केले. या कार्यक्रमाला शिस्तबद्ध रीतीने पूर्णत्वास नेण्यासाठी NCC विभागप्रमुख प्रा. प्रवीण भालेराव NCC कॅडेट, NSS स्वयंसेवक, विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या एकत्रित सहकार्याने सदर वार्षिक पारितोषिक वितरण व स्नेहसंमेलन समारंभ यशस्वीरित्या संपन्न झाला.

## डोंबिवलीत ठाकरे बंधूंच्या युतीमुळे आनंद मिरवणूक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** मराठी माणसाच्या मनातील अनेक वर्षांपासूनचा विचार प्रत्यक्षात आल्याने उत्साहाला चैतन्य. उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या युतीवर शिक्का मोर्तब झाल्याने दोन्ही बाजूच्या कार्यकर्त्यांमध्ये आणि मराठी माणसांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



आज डोंबिवलीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सर्वेसर्वा राज ठाकरे या दोन्ही राजकीय पक्षांची युती झाल्यामुळे दोन्ही पक्षाचे कार्यकर्त्यांनी मिळून संयुक्तरीत्या आनंद मिरवणूक काढली. प्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयाला पुष्पहार अर्पण केला नंतर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाला पुष्पहार अर्पण केला आणि गणपती मंदिर पर्यंत वाजत गाजत मिरवणूक गेली. मनसेचे जिल्हा सचिव राहुल कामात डोंबिवली शहर अध्यक्ष मनोज घरत, महिला अध्यक्षा कोमल पाटील, उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख तात्यासाहेब माने, उपजिल्हाप्रमुख राहुल भगत, शहरप्रमुख कुणाल ढापरे, प्रकाश तेलगोटे, अभिजीत सावंत, प्रतीक पाटील ,योगेंद्र भोईर, ट्विंकल भोईर, वैशाली किरण म्हात्रे, आदित्य पाटील, प्रियांका विचारे, अर्चना पाटील, वंदना बेलेकर विमल बोरसे . प्रमोद कांबळे, परेश पाटील तसेच मनसेचे राहुल कामत, मनोज घरत, योगेश पाटील, कोमल पाटील, दीपिका पेडणेकर, अरुण जांभळे, प्रल्हाद म्हात्रे, वेदांगी म्हात्रे, प्रतीक देशपांडे, निलिमा भोईर,आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राज्यातील २९१ आरोग्य सेविकांच्या नियुक्त्या नियमित होणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

राज्यातील जिल्हा परिषदांतर्गत आरोग्य विभागामध्ये कार्यरत व सेवानिवृत्त झालेल्या बंधपत्रित २९१ आरोग्य सेविकांच्या नियुक्त्या नियमित करण्याबाबत विभागीय आयुक्तांना अधिकार देण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या निर्णयानुसार जिल्हा परिषदांतर्गत आरोग्य सेवक (महिला) यांची पदे ही सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारित संचालक, आरोग्य सेवा संचालनालयामार्फत शासकीय परिचर्या महाविद्यालयातून प्रशिक्षण घेतलेल्या उमेदवारांमधून दोन वर्षाच्या कालावधीसाठी भरण्यात येत असत. हा कालावधी संपल्यानंतर या उमेदवारांना कार्यमुक्त केले जात असे. त्यानंतर संबंधित जिल्ह्यातील रुग्णसेवेची निकड व जिल्ह्यातील रिक्त पदांची स्थिती लक्षात घेता त्यांना ११ महिन्यांची अस्थायी नियुक्ती देण्याचे अधिकार विभागीय आयुक्तांना होते. विभागीय आयुक्तांचा हा अधिकार २०१८ मध्ये रद्द करण्यात आला होता. मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार आता राज्यातील जिल्हा परिषदेअंतर्गत आरोग्य विभागात १५ एप्रिल २०१५ पूर्वी नियुक्त झालेल्या तसेच सेवानिवृत्त झालेल्या व सध्या कार्यरत अशा २९१ बंधपत्रित आरोग्य सेविका यांच्या सेवा नियमित करण्याबाबतचे अधिकार विभागीय आयुक्त यांना देण्यात आला आहे.



दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता
news.thanejeevandeep@gmail.com
पान : ०२
ठाणे ■ गुरुवार
२५ डिसेंबर २०२५



## उत्कर्ष कला महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना निवासी श्रमसंस्कार शिबीर



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर ग्रामीण(नरेंद्र पाटील)**

वासिंद जवळील भातसई येथील उत्कर्ष कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना शिबिर कृषी तंत्र विद्यालय खानीवली येथे दिनांक 24 /12/ 25 ते 30/ 12 /25 या सात दिवसासाठी आयोजित केले आहे हे निवासी श्रमसंस्कार शिबिर असून या सात दिवसीय शिबिरात योगा, पर्यावरण संवर्धन आणि कचरा व्यवस्थापन,आरोग्य समस्या व उपाय, व्यक्तिमत्व विकास, विविध क्षेत्रातील नोकरीच्या संधी, निरीक्षण कौशल्य, युवा व हेतू पूर्वक जीवन, सामाजिक क्षेत्रातील संधी या विषयावर शिबिरामध्ये मार्गदर्शन होणार आहे. या शिबिरासाठी तज्ञ मार्गदर्शकांकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाणार आहे या कार्यक्रमासाठी मुंबई विद्यापीठाचे कार्यक्रम समन्वयक सुशील शिंदे जिल्हा समन्वयक जीवन विचारे व विभागीय समन्वयक राजू रूपवते आदी प्रमुख मार्गदर्शक व प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत या सात दिवसीय निवासी श्रमसंस्कार शिबिरामध्ये स्वच्छता अभियान, पर्यावरण संवर्धन, पाणी आडवा पाणी जिरवा, स्त्रीसाक्षरता,योगा प्रशिक्षण व वृक्षारोपण आदी विशेष उपक्रमात विद्यार्थ्यांचा सहभाग असणार आहे या श्रमदानामध्ये विद्यार्थी स्वतः सहभागी होऊन गावातील आजूबाजूच्या खेड्यातील नागरिकांनाही मार्गदर्शन करणार आहेत. या श्रमसंस्कार निवासी शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी संस्थेचे विद्यमान अध्यक्ष अरुण वारघडे, उपाध्यक्षअनिल मानवडे,सचिव रामदास शेळके, खजिनदार वृषाली जाधव सहसचिव अरुण भालेकर, गोपीनाथ पाटील कृषी विद्यालयाचे प्राचार्य प्रवीण पितांबरे सामाजिक कार्यकर्ते भगवान भोईर आदी मान्यवर उपस्थित होते.

या निवासी श्रमसंस्कार शिबिरासाठी उत्कर्ष कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेषराव मसूडकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्राध्यापक अजित पोटे, नितीन वेखंडे, दीपिका बिडवी, भारती सोपनार यांनी उत्कृष्ट नियोजन केले आहे

## ठाणे महापालिका निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्रांचे वाटप

### वागळेमधून एका उमेदवाराचा अर्ज दाखल

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी आज (24.12.2025) ठाणे शहरातील 9 प्रभागातून आज एकूण 1001 नामनिर्देशन पत्रांचे वाटप करण्यात आले असल्याची माहिती प्रभागसमितीनिहाय नियुक्त करण्यात आलेल्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिली.


तर वागळे प्रभागसमिती मधून अपक्ष उमेदवार संजय रजनीकांत पंड्या यांनी आपला उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी वृषाली पाटील यांच्याकडे दाखल केला.

दिनांक 23 व 24 डिसेंबर 2025 या दोन दिवशी मिळून एकूण 2070 उमेदवारी अर्जाचे वाटप करण्यात आले.

प्रभागसमितीनिहाय आकडेवारी
(प्रभाग क्रमांक 1,2,3,8) माजिवडा मानपाडा प्रभागसमिती - 190
(प्रभाग क्रमांक 4,5,7) वर्तकनगर प्रभागसमिती - 104
(प्रभाग क्रमांक 6,13,14,15) लोकमान्य सावरकर प्रभागसमिती - 141
(प्रभाग क्रमांक 16,17,18) वागळे प्रभागसमिती – 81
(प्रभाग क्रमांक 19,20,21,22) नौपाडा- कोपरी प्रभागसमिती - 102
(प्रभाग क्रमांक 10,11,12) उथळसर प्रभागसमिती - 91
(प्रभाग क्रमांक 9,23,24,25) कळवा प्रभागसमिती - 67
(प्रभाग क्रमांक 26,31, 30, 32) मुंब्रा प्रभागसमिती - 132
(प्रभाग क्रमांक 27,28, 29, 33) दिवा प्रभागसमिती - 93

## कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीत मतदान वाढीसाठी स्पर्धांच्या माध्यमातून जनजागृती







**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीतील मतदानाची टक्केवारी वाढावी या अनुषंगाने कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या स्वीप टिमचे समन्वयक अधिकारी संजय जाधव अणि सहा. अधिकारी विजय सरकटे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. शालेय विद्यार्थी हे या देशाचे भावी नागरिक/ मतदार असल्यामुळे महापालिका क्षेत्रातील शाळा व महाविद्यालयांमध्ये शालेय विद्यार्थ्यांच्या चित्रकला स्पर्धा, वाद विवाद स्पर्धा, घोष वाक्य स्पर्धा इ. उपक्रमांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. या मध्ये के. सी. गांधी हायस्कूल, राष्ट्रीय विद्यालय इ. शाळांनी उत्साहात या स्पर्धांमध्ये सहभाग घेतला.

## गोवेली ग्रामीण रुग्णालय परिसरात आढळला परिचारिकेचा मृतदेह

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीतील गोवेली ग्रामीण रूग्णालय परिसरात परिचारिकेचा मृतदेह आढळल्याच्या घटनेने परिसरात खळबळ माजली आहे. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, गोवेली शासकीय रूग्णालय परिसरातील कामगार काँटर परिसरात राहणाऱ्या परिचारिका कामिनी गायकवाड ह्या रविवारी दुपारी साडेतीन-चार च्या सुमारास त्या इमारतीच्या टेरेसवर झाडांना पाणी घालण्यासाठी गेल्या होत्या. यावेळी त्यांचा पाय घसरल्याने किंवा अन्य कारणाने तोल जाऊन त्या खाली कोसळल्या असाव्यात असा प्रथमदर्शनी अहवाल सादर करण्यात आला आहे. या भीषण अपघातात त्यांच्या डोक्याला आणि पायाला गंभीर दुखापत झाली. बराच वेळ हा प्रकार कोणाच्याही लक्षात आला नाही, मात्र सायंकाळच्या सुमारास परिसरात काम करणाऱ्या मजुरांना त्यांचा मृतदेह दिसून आला. त्यानंतर तात्काळ पोलिसांना पाचारण करण्यात आले. यासंदर्भात पोलिसांनी घटनास्थळी जात पंचनामा करीत आकस्मात मुत्यू झाल्याची नोंद केली आहे. कल्याण ग्रामीण पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरिक्षण पकंज गिरी यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, गोवेली शासकीय रूग्णालय कामगार काँटर येथे निवास करणार्या परिचारिका कामिनी गायकवाड यां झाडांना पाणी देण्यासाठी टेरेस वर गेल्या असता पडल्याने त्यांचा मुत्यू झाला, त्यासमयी त्या एकटया होत्या. त्यांची दोन्ही मुले बाहेर गेली होती. त्यांना बीपीचा त्रास देखील होता. या प्रकरणी एडीआर दाखल केला असल्याचे सांगितले.

## अल्कोहोलिक्स अॅनॉनिमस शहापूर समूहाचा वर्धापन दिन




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : अल्कोहोलिक्स अनॉनिमस ही जगभरात पसरलेली संघटनाआहेआणि तिचे अस्तित्व सुमारे १८० देशांमध्ये आणि भारतातील बहुतेक राज्यांमध्ये आहे.ए ए म्हणून ओळखली जाणारी ही संघटना दारू पिणाऱ्यांना संदेश देण्याचे काम करते.ए ए स्थानिक समूहआणि दारूपासून दूरअसलेल्या त्यांच्या सदस्यांद्वारे बैठका आयोजित करते.या सभेत सभासदआपलेअनुभव कथन करतात त्यामुळे या बैठकांना उपस्थित राहणाऱ्या पीडित मद्यपींना दारू पिण्यापासून दूर राहण्याचीआशाआणि शक्ती मिळते.एए ही एक ना नफा - ना तोटा या तत्त्वावर चालणारी संस्थाआहे,ए ए कोणत्याही प्रकारची वर्गणी आकारत नाहीआणि ती तिचे दैनंदिन कार्य फक्त ए ए सदस्यांकडून मिळणाऱ्या निधीवर चालवते.ए ए कोणतीही बाहेरील निधी किंवा देणग्या स्वीकारत नाही.एए चा कोणत्याही राजकीय,आध्यात्मिक किंवा सामाजिक संघटनांशी संबंध नाही.एए संलग्नतेऐवजी अल्कोहोल व्यसनमुक्तीच्या क्षेत्रात काम करणाऱ्या इतर संस्थांना सहकार्य करते.भारतात व मुंबई येथे ए ए च्या सभा होत असतात.

संस्थेचे कल्याण येथे 'ए ए कल्याण आंतर समूह' म्हणून प्रतिनिधिक कार्यालय आहे,त्यांचा संपर्क क्रमांक 9323485476 हा असून आपण तेथेही संपर्क साधू शकतात,याआंतरसमूहाअंतर्गत दिवा,डोंबिवली,ठाकुर्ली,भिवंडी,कल्याण,उल्हासनगर, अंबरनाथ,बदलापूर,वांगणी इकडे शहापूर इत्यादींचा समावेश आहे.या सर्व ठिकाणी संस्थेच्या नियमित सभा होतं असतात.विनामूल्य कार्य करणाऱ्या विश्वव्यापी संस्थेची शाखा "ए ए शहापूर समूहास"11 वर्ष पूर्ण झाली. त्या निमित्ताने येत्या गुरुवारी, दि.:२५/१२/२५, रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत मद्यपीडितांसाठी जनकल्याण माध्यमिक शाळा, DYSP ऑफिस समोर,शहापूर येथे एक कार्यक्रमआयोजित केला आहे सातत्याने गेली 11 वर्ष ए ए शहापूर समूह कार्यरत राहून संभाव्य मद्यपीना ए ए चा मद्य मुक्तीचा मार्ग दाखवत आपले कार्य करीत आहे. ए ए शहापूर समुहाच्या नियमित सभा दर शनिवारी सायं 05.00 ते 06.30 वा.जनकल्याण माध्यमिक शाळा, DYSP ऑफिस समोर, शहापूर येथे नियमितपणे होतात.आपल्या संपर्कातअथवा परिचयात जर कोणीअतिमद्यपीअसेल तरआपण खाली दिलेल्या नंबरवर संपर्क करुशकता.संपर्क:9892917639/9372582998/9225715430आपला संपर्क एक घर तसेच एक उध्वस्त आयुष्य वाचवू शकतो.

( ही जाहिरात नसून जनहितार्थ यास प्रकाशित करीत आहोत.)

## विद्यार्थिनी गैरवर्तणूक प्रकरणी मुख्याध्यापकावर कठोर कारवाई करा

### आदिवासी आधार फाउंडेशनची निवेदनाद्वारे मागणी




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**वाडा :** आदिवासी विकास प्रकल्प अंतर्गत येणारी आश्रमशाळा आमगाव ता. वाडा जि. पालघर ह्या ठिकाणी मागील चार महिन्यांपासून शाळेचे मुख्याध्यापक विद्यार्थिनींबाबत गैरवर्तवणूक करत असल्याबाबत वाडा पोलीस ठाणे या ठिकाणी विद्यार्थिनींच्या वतीने तक्रार दाखल करण्यात आली आहे. कबड्डी शिकवत असताना वाईट स्पर्श करणे, कार्यालयात बोलावून अश्लील संभाषण करणे, शेरेबाजी करणे, मनात लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन करणे इत्यादी प्रकारचे गैरवर्तन केल्याचे विद्यार्थिनींनी केलेल्या तक्रारीत म्हटले आहे. सदर प्रकरणी वाडा पोलीस ठाण्यामध्ये मुख्याध्यापक खरुळेकर ह्याच्या विरोधात पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करून आरोपीस अटक सुद्धा करण्यात आली आहे. सदरील घटना गंभीर, निंदनीय असून प्रकरणी तालुक्यात संतापाचे वातावरण आहे. तरी घटनेच्या अनुषंगाने मुख्याध्यापकावर कठोर कायदेशीर व प्रशासकीय कारवाई करावी. जेणेकरून यापुढेही असे प्रकार घडणार नाहीत. बाबत आज आदिवासी आधार फाउंडेशनच्या वतीने वाडा तहसीलदार व वाडा पोलीस निरीक्षक ह्यांना पत्र देण्यात आले. ह्यावेळी फाउंडेशनचे संस्थापक कल्पेश ठाणगे, कॉ. कपिल पाटील, कॉ. नितेश म्हसे, रोहित धूम आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## ऐतिहासिक म्हसोबा यात्रेसाठी प्रशासनाची व ग्रामपंचायतीची तयारी सुरू



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड :** सुमारे दोनशे वर्षाची ऐतिहासिक परंपरा असलेल्या ठाणे जिल्ह्यातील सर्वात मोठ्या अशा मुरबाड म्हसोबा यात्रेला येत्या 3 जानेवारी 2026 पासुन सुरवात होत आहे. पंधरा दिवस चालणाऱ्या या यात्रेचे नियोजन प्रशासकीय प्रमुख म्हणून मुरबाडचे तहसीलदार यांच्या अधिपत्याखाली सर्व प्रशासकीय यंत्रणा,म्हसा ग्रामपंचायत व म्हसोबा देवस्थान ट्रस्ट यांच्या मार्फत होत असते. त्यादृष्टीने यात्रा सुरळीत व निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी नियोजनाच्या बैठका घेतल्या जातात. मुरबाड विधासभेचे आमदार किसन कथोरे यांच्या प्रमुख अध्यक्षतेखाली नुकतीच बैठक पार पडली असून सर्व प्रशासकीय यंत्रणांना यामध्ये पोलीस यंत्रणा, महावितरण, आरोग्य विभाग, पाणी पुरवठा, सार्वजनिक बांधकाम, पोलीस वाहतूक विभाग, म्हसा ग्रामपंचायत अशा सर्वच विभागांना योग्य त्या सुचना आमदार कथोरे यांनी केल्या आहेत. दरवर्षी प्रमाणे यंदाची यात्राही सुरळीत कशी पार पडेल यासाठी सर्वांचे सहकार्य महत्वाचे आहे. यात्रेत येणाऱ्या भाविकांना कुठलाही त्रास होणार नाही याची काळजी घेण्याचे आवाहन आमदार कथोरे यांनी केले आहे.

म्हसा यात्रे निमित्त म्हसा पंचक्रोशीतील गावातील नागरिक सुद्धा म्हसोबाच्या यात्रेची आतुरतेने वाट पाहत असून यात्रेत बैलांची खरेदी विक्री, घोंगडी, चादरी, ब्लँकेट, मिठाई व गृहपयोगी वस्तुंच्या माध्यमातून करोडो रूपयांची आर्थिक उलाढाल होत असते. यावर्षी सुद्धा मोठी आर्थिक उलाढाल होण्याचा अंदाज व्यापारी वर्गातून वर्तविण्यात येत आहे.

## महिला, शेतकरी, सैनिक, आई - वडील आणि शिक्षकांचा सदैव आदर करा - प्रा. डॉ. रघुनंदन आठल्ये



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : विद्यार्थ्यांनी कुटुंबात आणि समाजात वावरताना नेहमी महिलांचा सन्मान करावा, ज्यांच्यामुळे आपल्याला अन्नधान्य मिळते त्या शेतकऱ्यांचा आणि ज्यांच्या त्यागामुळे आपण सुरक्षित आहोत त्या सैनिकांचा नेहमी आदर करावा. तसेच आई - वडील, समाजातील वडिलधारी माणसे आणि शिक्षक यांच्याकडून नेहमी चांगल्या गोष्टी आत्मसात करून आपली प्रगती करावी आणि योगासने करून मानसिक आणि शारीरिक आरोग्य चांगले ठेवावे असे प्रतिपादन बांदोडकर कॉलेज ठाणेचे सेवानिवृत्त प्राध्यापक डॉ. रघुनंदन आठल्ये यांनी स्नेहसंमेलनाचे उद्घाटन प्रसंगी केले.


श्रीमती सावित्रीदेवी थिराणी विद्यामंदिर आणि सुशीलकुमार थिराणी ज्युनिअर कॉलेज ऑफ कॉमर्स अँण्ड सायन्स, वर्तकनगर, ठाणे चा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ आणि स्नेहसंमेलन दि. 19 व 20 डिसेंबर 2025 रोजीसंस्थेचे कार्याध्यक्ष राजेंद्र आयरे यांच्या अध्यक्षतेखाली व कोषाध्यक्ष उदय भागवत व दोडकर कॉलेजचे सेवानिवृत्त प्राध्यापक डॉ. रघुनंदन आठल्ये या प्रमुख पाहुण्यांचे उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी भारतीय संस्कृती आणि महाराष्ट्रातील लोककला या विषयांवर आधारित गायन, नृत्य, नाटिका आणि भारुडे इ. कार्यक्रम सादर केलेत.

शुक्रवार दिनांक 19 डिसेंबर 2025 रोजी झालेल्या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन प्रसंगी कोषाध्यक्ष उदय भागवत यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाचे वेळापत्रक तयार करून टी.व्ही आणि मोबाईल पासून दूर राहून अभ्यास करून यश संपादन करण्याचे आवाहन केले. अभ्यासाबरोबर कला, क्रीडा आणि संस्कृती इ. क्षेत्रात देखील विद्यार्थ्यांनी यश प्राप्त करावे असेही त्यांनी सांगितले.

वर्तक नगर शिक्षण मंडळाचे कार्याध्यक्ष राजेंद्र अहिरे यांनी अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना प्रयत्न, चिकाटी, सातत्य,मेहनत आणि प्रामाणिकपणा इ. गोष्टींशिवाय यश मिळवणे शक्य नसते म्हणून विद्यार्थ्यांनी नेहमी चिकाटी आणि सातत्य ठेवून यश संपादन करावे आणि आपले ध्येय साध्य करावे असे सांगितले. मुख्याध्यापक पदमसिंग परदेशी यांनी अहवाल वाचनातून शाळेतील विविध उपक्रम आणि सहशालेय उपक्रमांबद्दलचा लेखाजोखा सादर केला. सांस्कृतिक प्रमुख शैलजा शिराळ यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रम प्रमुख म्हणून पर्यवेक्षिका सुचिता पारखे व चारूलता राव यांनी जबाबदारी पार पडली. स्नेहसंमेलनाचे सूत्रसंचालन शरद वांगड, छाया बांबळे, संध्या कोतकर आणि भाग्यश्री पाटील इ. नी केले. कार्यक्रमाच्या वेळी विश्वस्त खूबचंद शेजवानी, मुख्य चिटणीस संजय राव, संयुक्त चिटणीस संजय राऊत आणि गिरीश पाटील, माजी कार्याध्यक्ष देविदास जोशी, सदस्य वसंतराव शिंदे,नरहरी समर्थ,जयंत आजगावकर आणि श्रीकांत कठाडे इ. उपस्थित होते.

## भिवंडी तालुक्यात बिबट्याच्या बाबतीत वनखात्याची खबरदारी

### नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नयेत,वनखात्याकडून अवाहन!




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**झिडके-अंबाडी** : ठाणे जिल्ह्यात शहापूर व मुरबाड तालुक्यात काही ठिकाणी बिबट्याचा वावर असल्याची चर्चा सोशल मिडीयावर दिसून येत आहेत,तर काही ठिकाणी बिबट्याच्या हल्ल्यात शेळ्या मारल्या गेल्या आहेत, त्यामुळेच बिबट्याचा योग्यरित्या बंदोबस्त करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी वनखात्याच्या कर्मचारीवर्गावर येऊन पडली आहे.त्यामुळेच वनखात्याचे कर्मचारीवर्ग आपापल्या कार्यक्षेत्रात आपली चोखपणे जबाबदारी पार पाडत आहेत,त्याचबरोबर नागरिकांनी घाबरून न जाता दक्ष राहून,वनखात्याच्या संपर्कात राहणे अत्यावश्यक आहे.

जिल्ह्यातील शहापूर,मुरबाड तालुक्यातील बिबट्याच्या हल्ल्याच्या घटनांबद्दल सर्वच ठिकाणी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असतानाच भिवंडी तालुक्यातील वनखात्याकडून खबरदारी म्हणून कार्यक्षेत्रात विशेष गस्त पथकाने सर्वेक्षण मोहीम राबविण्यात येत आहे.भिवंडी तालुक्यातील दुगाड वनपरिमंडळ अधिकारी ज्ञानेश्वर शेलार हे आपल्या वनपरिक्षेत्र अधिकारी पुजा रक्कटाटे यांच्या मार्गदर्शनाखालीच आपल्या कार्यक्षेत्रातील अतिदुर्गम भागातील वनविभागात दक्षता घेत आहेत व नागरिकांनी बिबट्याबाबतच्या खोट्या अफवांपासुन अजिबात घाबरून जाऊ नये,असे अवाहन करीत आहेत. त्यामुळे येथील वनकर्मचारी व अधिकारी यांच्याबाबत आदराची तसेच विश्वासाची भावना निर्माण झाली आहे.




## भविष्यवेध



गुरुवार
२५ डिसेंबर २०२५

**मेष**
ताजेतवाने वाटू शकते. यश हातातोंडाशी येण्याची शक्यता वाटताना आपली ताकद कमी होत जाण्याची भावना निर्माण होईल. निराशाजनक आर्थिक परिस्थितीमुळे काही महत्त्वाच्या कामामध्ये खंड पडू शकतो.

**वृषभ**
दिवस उत्तम जाईल. आपल्या मित्रांना रात्रीचे जेवण आणि नृत्यासाठी बाहेर घेऊन जाण्यापूर्वी विचार करा. कार्यात यश मिळविण्यासाठी आपले मत ठामपणे मांडा. मित्रांच्या सहाय्याने अनुकूलता वाढेल.

**मिथुन**
व्यापार व प्रणयाच्या क्षेत्रात यश मिळेल. प्रिय व्यक्तीबरोबर संवाद होईल. आवश्यक कार्य देखील पूर्ण होतील. मित्रांचा अनुकूल सहयोग मिळेल. आपल्या आपल्या नातलगांची व मित्रांची चांगली भेट होईल.

**कर्क**
जे लोक बऱ्याच दिवसापासून खूप व्यस्त होते त्यांना आज स्वतःसाठी वेळ मिळू शकतो. वादविवाद किंवा कार्यालयातील राजकारण, तुम्ही या सगळयाला पुरून उराल. हसत खेळत वेळ खर्च होईल.

**सिंह**
लाभ प्राप्तिचा योग. व्यापारातील आर्थिक त्रासाला संयमाने सोडवच्याचा प्रयत्न करा. निवेश प्रत्याशित.आपल्या कार्याच्या दरम्यान आपल्या कौटुंबिक ताणांचे स्मरण करून त्यांना कार्यात मिसळू नये.

**कन्या**
घरगुती कामं बराच काळ व्यस्त ठेवतील. धार्मिक आणि अध्यात्मिक हेतू पूर्ण करण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे. अनियोजित माध्यमातून मिळणारे पैसे तुमचा दिवस उजळून टाकतील.

**तुळ**
जीवनात ध्येयावर लक्ष द्या पूर्ण विश्वासाने त्याच्या प्राप्तीचा प्रयत्न करा.व्यापारात कार्यक्षेत्राचा विकास, व्यापारिक बाधा येऊ शकतात. आय पेक्षा व्यय अधिक असल्याने आर्थिक तंगीची आशंका.

**वृश्चिक**
आपल्या व्यावसायिक योजनेबद्दल होकारात्मक दृष्टीकोण प्रदर्शित करा. आजचा दिवस व्यापार क्षेत्रातील चांगली बातमी आणणारा आहे. जुनी कामे झाल्यामुळे उत्साह आणि प्रसन्नता वाटेल.

**धनु**
व्यापार-व्यवसाय सहज राहील. कौटुंबिक सभासदांचा सहयोग मिळेल. यात्रा घडू शकते. अडकलेला पैसा मिळाल्याने आनंद वाटेल. कौटुंबिक चिंता दूर होईल. व्यावसायिक स्थिति चांगली राहील.

**मकर**
बळात वाढ होईल. आरोग्य उत्तम राहील. महत्त्वाच्या कामांसाठी श्रम करावे लागेल. आर्थिक विषयांमध्ये सावगिरी बाळगा. सुख-शांतीचे वातावरण राहील. हसत खेळत वेळ खर्च होईल.

**कुंभ**
आपल्या कार्याच्या दरम्यान आपल्या कौटुंबिक ताणांचे स्मरण करून त्यांना कार्यात मिसळू नये. आपल्या यावसायिक योजनेबद्दल होकारात्मक दृष्टीकोण प्रदर्शित करा. महत्वपूर्ण कार्यांवर व्यय होईल.

**मिन**
तटस्थ भूमिका घेणे, प्रगतिवर्धक बातम्या मिळतील. मुलांची उन्नति प्रसन्नता देईल. आधी केलेल्या कामाचे फळ मिळेल. बिघडलेले संबंध सुधारतील.नवीन जोखिम असलेली कार्ये टाळा.

# केडीएमसी निवडणूक प्रचारासाठी उपलब्ध मैदानांबाबतचे धोरण जाहीर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025-26 च्या प्रचारासाठी उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या मैदानांबाबतचे धोरण जाहीर करण्यात आले असल्याबाबतची माहिती मुख्य उद्यान अधिक्षक संजय जाधव यांनी दिली आहे. महापालिका सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम मा. राज्य निवडणूक आयोगाने 15/12/2025 रोजी जाहीर केला त्या अनुषंगाने वासुदेव बळवंत फडके मैदान कल्याण (प.), कै. यशवंतराव चव्हाण मैदान कल्याण (प.), कै. दादासाहेब गायकवाड मैदान कल्याण (पू.), वै. ह.भ.प. सावळाराम महाराज क्रिडा संकुल डोंबिवली (पू.), नेहरु मैदान डोंबिवली (पू.), कानोजी जेधे मैदान (भागशाळा मैदान ) डोंबिवली (प.), कै. नथू देवळेकर मैदान कल्याण (प.) ही 7 मैदाने महापालिका निवडणूकीच्या प्रचारासाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

या साठी 1) अर्जदार / पक्ष/ उमेदवार यांनी मैदानाच्या आरक्षणासाठी कमाल 5 दिवस व किमान 2 दिवस अगोदर अर्ज करणे बंधनकारक आहे. 2) अर्जदार / पक्ष/ उमेदवार यांनी उपरोक्त मैदानांपैकी 3 मैदाने पसंती क्रमांकानुसार मागणी करणे बंधनकारक आहे. 3) मैदानांच्या उपलब्धतेनुसार, प्राप्त झालेल्या अर्जाच्या क्रमांकानुसार 3 पैकी 1 मैदान उपलब्ध करुन देण्यात येईल. 4) एकाच वेळी जर अनेक पक्षांनी / उमेदवारांनी एकाच मैदानाची मागणी केल्यास समन्याय तत्वावर निर्णय घेण्याचा अंतिम अधिकार निवडणूक अधिकारी तथा महापालिका आयुक्त यांचा राहील. 5) सभेसाठी मैदान आरक्षित करतांना सभेच्या दिवशीची सर्व माहिती म्हणजे कोणाची सभा, सभा घेण्याऱ्याचे नाव, सभेसाठी उपस्थित प्रचारक यांची नावे इ. चा एकत्रित तपशील मा. निवडणूक आयोगाने दिलेल्या नमुन्यामध्ये देणे आवश्यक आहे. 6) सार्वत्रिक निवडणूकीच्या संबंधित स्टार प्रचारक तसेच प्रमुख पक्षाचे वक्ते यांच्या संदर्भातील सभेचा तपशिल अर्जासोबत महापालिका मुख्यालयातील नियंत्रण कक्षात सादर करावयाचा आहे.

प्रभाग स्तरावरील उमेदवारांच्या कॉर्नर सभा, रॅलीज, छोट्या चौक सभा याबाबतच्या परवानग्या संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाकडील एक खिडकी कक्षामार्फत दिल्या जातील तरी यासंदर्भात संबंधित उमेदवार/ राजकीय पक्ष यांनी संबंधित कार्यालयाकडे संपर्क साधावा असे आवाहन महापालिकेच्या मार्फत करण्यात येत आहे.

# रुग्णाची फसवणूक करणाऱ्या हॉस्पिटल कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी तालुक्यातील खोणी गांव परिसरात असलेल्या एका यंत्रमाग कारखान्यास पहाटेच्या सुमारास भिषण आग लागल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली होती. नागरिकांना अग्निशमन दलाच्या जवानांना व पोलिसांना माहिती देतात त्यांनी घटनास्थळी भाव घेतली जवानांनी शर्तीचे प्रयोग दाखवून सुमारे तीन तासात ही आग आटोक्यात विझवली आहे.

भिवंडी तालुक्यातील खोणी गाव येथील सिद्धार्थ नगर परिसरातील ज्योती टेक्सटाइल या यंत्रमाग कारखान्यास पहाटेच्या 5 वा.सुमारास भीषण आग लागण्याची खळबळजनक घटना घडली आहे. कारखान्यात असलेल्या सिलेंडरचा स्फोट मुळे ही आगीने रौद्र रूप धारण केल्याने या आगीत संपूर्ण यंत्रमाग कारखाना जळून खाक झाला असून शेजारील अन्य यंत्रमाग कारखाने रस्त्यावर उभ्या असलेल्या गाडया ही आगीच्या भक्ष्यस्थानी पडले आहेत.या आगीत यंत्रमाग तसेच कापडाचा मोठ्या प्रमाणावर साठा जळून खाक झाला आहे.आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन तीन तासात आगीवर नियंत्रण मिळवून आग आटोक्यात आणून शांत केली दरम्यान आग विझवण्याचा प्रयत्न करीत असताना स्फोट झाल्याने अग्निशमन दलाचे कर्मचारी कांतीलाल गुजर किरकोळ जखमी झाले आहेत.सुदैवाने या भीषण आगीत कोणतीही जीवितहानी झालेली नसली तरी मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे. आग नेमकी कशामुळे लागली याचा तपास सुरू आहे.

# भिवंडीत यंत्रमाग कारखान्यास भीषण आग



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी तालुक्यातील खोणी गांव परिसरात असलेल्या एका यंत्रमाग कारखान्यास पहाटेच्या सुमारास भिषण आग लागल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली होती. नागरिकांना अग्निशमन दलाच्या जवानांना व पोलिसांना माहिती देतात त्यांनी घटनास्थळी भाव घेतली जवानांनी शर्तीचे प्रयोग दाखवून सुमारे तीन तासात ही आग आटोक्यात विझवली आहे. भिवंडी तालुक्यातील खोणी गाव येथील सिद्धार्थ नगर परिसरातील ज्योती टेक्सटाइल या यंत्रमाग कारखान्यास पहाटेच्या 5 वा.सुमारास भीषण आग लागण्याची खळबळजनक घटना घडली आहे. कारखान्यात असलेल्या सिलेंडरचा स्फोट मुळे ही आगीने रौद्र रूप धारण केल्याने या आगीत संपूर्ण यंत्रमाग कारखाना जळून खाक झाला असून शेजारील अन्य यंत्रमाग कारखाने रस्त्यावर उभ्या असलेल्या गाडया ही आगीच्या भक्ष्यस्थानी पडले आहेत.या आगीत यंत्रमाग तसेच कापडाचा मोठ्या प्रमाणावर साठा जळून खाक झाला आहे.आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन तीन तासात आगीवर नियंत्रण मिळवून आग आटोक्यात आणून शांत केली दरम्यान आग विझवण्याचा प्रयत्न करीत असताना स्फोट झाल्याने अग्निशमन दलाचे कर्मचारी कांतीलाल गुजर किरकोळ जखमी झाले आहेत.सुदैवाने या भीषण आगीत कोणतीही जीवितहानी झालेली नसली तरी मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे. आग नेमकी कशामुळे लागली याचा तपास सुरू आहे.

# माजी सरपंच कुडलीक दामु शेलार यांचे निधन



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**गोवेली :** कल्याण तालुक्यातील बेहेरे खडवली ग्रामपंचायत माजी सरपंच कुडलीक दामु शेलार यांचे अल्पशा आजाराने दुःख द निधन झाल्याने कल्याण तालुक्यात दुख व्यक्त केले जात आहे.

कल्याण तालुक्यातील वावेघर गावातील माजी सरपंच कुडलीक दामु शेलार यांचे सोमवार दिनांक २३डिसेंबर रोजी अल्पशा आजाराने दुःख द निधन झाले.त्यांच्या अंत्ययात्रेला प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता.सर्वच राजकीय पक्षातील मान्यवर व पत्रकार परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# ठाणे मनपा मुख्यालयातील निवडणूक कामकाजाचा आयुक्त सौरभ रावांकडून आढावा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (23) :** ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025-26 ची प्रक्रिया सुरळीत व पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली असून मा. राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार माध्यम प्रमाणन आणि संनियंत्रण समिती अंतर्गत 'प्रसारमाध्यम निरीक्षण कक्ष' महापालिका मुख्यालयातील पहिल्या मजल्यावर कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात स्थापन करण्यात आला आहे. या कक्षाची पाहणी आज निवडणूक अधिकारी तथा आयुक्त सौरभ राव यांनी केली व या कक्षामार्फत चालणाऱ्या कामकाजाचा आढावा घेतला.



यावेळी अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे, उपायुक्त जी.जी गोदेपुरे, उपायुक्त निवडणूक उमेश बिरारी, उपायुक्त तथा नोडल अधिकारी मिताली संचेती, नोडल अधिकारी तथा प्र. उपमाहिती जनसंपर्क अधिकारी प्राची डिंगणकर उपस्थित होते.

या समिती मार्फत निवडणूक काळात राजकीय पक्ष व उमेदवार यांचेकडून प्रसारित, प्रसिध्द करावयाच्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांसाठीच्या प्रस्तावित जाहिरातींचे पूर्वप्रमाणन करणे, प्रसारमाध्यमांना माहिती देण्याचे काम करण्यात येणार असून या कक्षात काम करत असलेल्या सर्व अधिकारी कर्मचारी यांनी सतर्क राहून काम करावे अशा सूचना निवडणूक अधिकारी तथाआयुक्त सौरभ राव यांनी दिल्या. आचारसंहिता कालावधीत सर्वच घटकांनी आदर्श आचारसंहिता नियमावलीचे पालन करावे व प्रसारमाध्यमांनीही सर्वांना समान न्याय या तत्वावर आचारसंहितेस अनुसरून वस्तुनिष्ठ वृत्ते प्रसिध्द करावीत तसेच मतदारांनी मतदान करण्यासाठी माध्यमातून प्रयत्न करावेत, असे आवाहन निवडणूक अधिकारी तथा आयुक्त सौरभ राव यांनी केले.

# पडघा ते शिर्डी पदयात्रा पालखी सोहळ्यास नागरीकांचा प्रतिसाद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा :** भिवंडी तालुक्यातील पडघा येथील ओम साईभक्त सांस्कृतिक मंडळाच्या वतीने आयोजित पडघा ते श्रीक्षेत्र शिर्डी पदयात्रा पालखी सोहळयास नागरीकांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला.

२४ ते ३० डिसेंबर २०२५ दरम्यान ओम साई भकतसंस्थापक अमोल बिडवी मंडळाचे अध्यक्ष अमीत बिडवी यांच्या मार्गदर्शनाखाली या पालखी सोहळयाचे आयोजन करण्यात आले असुन शास्त्रीनगर येथील समाधी मंदीर येथे बुधवारी अभिषेक, पुजन, महाआरती करून पालखी सोहळयाची सुरुवात करण्यात आली मंडळाचे हे २९ वे वर्ष असून यावेळी फुलांनी सजवलेली पालखी संपुर्ण पडघे गावातुन फटाक्यांच्या आतेषबाजीत वाजत गाजत फिरवण्यात आली यावेळी महीलांनी, नागरीकांनी पालखीचे औक्षण करुन घरासमोर सुबक रांगोळया काढल्या होत्या तर चौका चौकात नागरीकांनी पालखी व साईभंक्ताचे स्वागत करुन गावाच्या वेशीपर्यत पालखी सोबत चालुन शिर्डी जाणाऱ्या साईभक्तानां निरोप दिला.यावेळी .शिवसेना नेते प्रकाश पाटील, सरपंच सायली पाटील, ठाणे जिल्हा मजुर फेडरेशनचे माजी अध्यक्ष व विद्यमान संचालक पंडीत पाटील, मनसे भिवंडी लोकसभा जिल्हाप्रमुख व माजी सरपंच शैलैश बिडवी माजी उपसरपंच अभिषेक नागावेकर भाजप शहर अध्यक्ष उमेश शेरेकर, उद्योजक संजय पटेल, गिरीश पटेल, राजेश जाधव, संतोष घोलप संजय बिडवी, रवी भोईर, तुषार आळशी, आदी मान्यवर उपस्थित होते यावेळी पालखीचे दर्शन घेण्यासाठी नागरीकांनी गर्दी केली होती.









# भिवंडी मनपा निवडणूक आचारसंहिता पथकाकडून 8 लाख रक्कम जप्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका निवडणूक आदर्श आचारसंहिता कालावधीत स्थिर तपासणी पथकाने (Static Surveillance Team) नदीनाका परिसरात आचारसंहिता पथक प्रमुख तथा अतिरिक्त आयुक्त, विठ्ठल डाके, तसेच सहायक पथक प्रमुख समीर जवरे व शाकीब खर्बे यांचे नियंत्रणाखाली दिनांक 23.12.2025 रोजी सायंकाळी 06.38 वाजता तपासणीदरम्यान चारचाकी वाहन किया सेल्टॉस क्रमांक MH48 DD 9324 या वाहनातून रु. 8,28,900/- इतकी रोख रक्कम जप्त केली. सदर रकमेबाबत संबंधितांकडे विचारपूस केली असता कोणतेही समाधानकारक उत्तर अथवा वैध कागदपत्रे सादर करण्यात आले नाहीत. त्यामुळे सदर रक्कम दोन पंचांच्या उपस्थितीत पंचनामा करून पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, निजामपूर पोलीस ठाणे यांच्या सुपूर्द करण्यात आली आहे. सदर कारवाई वेळी पथक प्रमुख गौतम आनंद भालेराव, . मारोती भागोजी भारती पोलीस हवलदार, निखील साळवे, एजाज शेख व मनोज गुज्जा हे उपस्थित होते.

# डॉ. देवीदास बामणे लिखित 'उपन्यासकार विवेकी राय' पुस्तकाचे प्रकाशन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** पेण एज्युकेशन सोसायटीचे भाऊसाहेब नेने कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, पेण येथे आज 'मैत्रेय–२०२५' या वार्षिक गॅदरिंग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या उद्‌घाटन प्रसंगी डॉ. देवीदास बामणे लिखित "उपन्यासकार विवेकी राय" या पुस्तकाचे प्रकाशन पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड. मंगेश नेने यांच्या हस्ते संपन्न झाले.

या प्रसंगी प्रसिद्ध दूरदर्शन मालिकेतील 'नवरी मिळे हिटलरला' या सिरियलमध्ये "रेवती"ची भूमिका साकार करणाऱ्या श्रीमती आलापिणि निसळ प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. संस्थेचे कार्याध्यक्ष प्रशांत ओक, मानद सचिव सुधीर जोशी, संचालक समीर साने, माजी कार्याध्यक्ष वसंतराव आठवले, घ. वि. देव, प्राचार्य डॉ. एस. बी. धारप, पत्रकार मित्र, पालकवर्ग तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



हे पुस्तक प्रामुख्याने ग्रामीण जीवनावर आधारित आहे. यात डॉ. विवेकी राय यांच्या बबूल, पुरुष पुराण, लोकऋण, श्वेतपत्र, सोनामाटी, समर शेष है, मंगल भवन, अमंगलहारी, नमामी ग्राम्य आणि देहरी के पार या दहा उत्कृष्ट कादंबऱ्यांचा सखोल अभ्यास करून त्यांचे सविस्तर विश्लेषण करण्यात आले आहे.या सर्व कादंबऱ्यांमधून ग्रामीण समाजातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक व धार्मिक परिस्थितीचे वास्तव चित्रण आढळते. ग्रामीण भागातील गरीब व श्रमिक समाजाचे दुःख, बोलीभाषा, जीवनशैली, खानपान, विवाहसंस्कार इत्यादी पैलूंचे अतिशय बारकाईने वर्णन विवेकी राय यांनी आपल्या साहित्यात केले आहे. त्यांनी सदैव शोषित आणि वंचित घटकांच्या बाजूने लेखन केले असून शोषक वर्गावर प्रखर प्रहार केला आहे.

या प्रकाशनप्रसंगी संस्थेचे कुटुंबप्रमुख व माजी अध्यक्ष ॲड. बापूसाहेब नेने, सध्याचे अध्यक्ष ॲड. मंगेश नेने, मानद सचिव बाळासाहेब जोशी, कार्याध्यक्ष प्रशांत ओक, उपाध्यक्ष व खजिनदार संजय कडू, तसेच इतर पदाधिकारी, प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि डॉ. बामणे यांच्या कुटुंबीयांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# स्थानिक स्वराज्यसंस्था निवडणुकीत महिला उमेदवार महिलांचे प्रश्न व नागरिकांच्या समस्या सोडविणाऱ्या असाव्यात

## डोंबिवलीतील महिलांचे मत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** डोंबिवली स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक जानेवारी महिन्यात होणार असून यात ५० टक्के महिला आरक्षण आहे. या निवडणुकीच्या निकालानंतर सर्वसाधारण सभेत महिला नगरसेविकांचा आवाज घुमणार आहे.याबाबत डोंबिवलीतील विविध सामाजिक संस्था,गृहिणी यांनी याबाबत आपले मत मांडले. उच्चशिक्षित महिला, राजकीय माहिती, लोकांचे प्रश्न यावर महासभेत बोलणाऱ्या असाव्यात असे काहींचे मत आहे तर निवडून आलेल्या गृहिणी जरी सभेत नागरिकांच्या प्रश्नांवर बोलल्या तर प्रश्न नक्कीच सुटलील असे काहींचे मत आहे. मानिनी महिला मंडळ अध्यक्ष तथा समाजसेविका सुलेखा गटकळ म्हणाल्या, आता निवडणुका लागल्याने सर्व विषय चर्चेत आहे. 50 टक्के महिलांना आरक्षण आहे. प्रश्न आहे योग्य की अयोग्य. माझं मत म्हणाल तर 50% योग्य आहे. परंतु उमेदवार निवडताना त्याला राजकारणाचा अनुभव असणे गरजेचे आहे. म्हणजे तो उच्चशिक्षित असो किंवा नसो. त्याला समाजात काय चाललं याचा अनुभव नक्की पाहिजे. ज्या वेळी ती महिला उमेदवार फॉर्म भरते त्यावेळी तिच्याकडून लेखी स्वरुपात लिहून घ्यायचं की ती स्वतः काम करणार आहे. महिलांना 50 टक्के आरक्षण हे पाहिजेच मी तर म्हणेन मुख्यमंत्री सुद्धा महिलाच व्हायला पाहिजे.महिलांच्या हातात राज्य देऊन बघा खूप छान नियोजन असेल. आर्थिक सल्लागार सुप्रिया बेर्डे म्हणाल्या, राजकारणात महिला उमेदवार असणं हा पर्याय नाही, गरज आहे.महिला उमेदवार ही कमीत कमी पदवीधर असावी असं माझं मत आहे.शिक्षित महिला म्हणजे भावनांवर नाही, विचारांवर निर्णय.सत्ता समजून वापरणारी महिला समाज घडवते, तोडत नाही.महिला नेतृत्व म्हणजे कमकुवतपणा नाही, ती शिस्त आहे. देशाला घोषणांपेक्षा समजूतदार निर्णयांची गरज आहे. समाजसेविका तथा सूत्रसंचालिका पूजा तोतला म्हणाल्या, शिक्षित अशिक्षित या गोष्टीत न अडकता उमेदवार हा हुशार प्रामाणिक निस्वार्थपणे काम करणारा असावा व प्रभागातील जनतेसाठी व सर्व सामान्यासाठी कायम उपस्थित असावा.

वैशाली आनंदराव भोसले म्हणाल्या, महिला उमेदवार या ॲडव्होकेट असाव्यात.महिला उमेदवार या महिलाच्या सुरक्षिततेवर व अन्यायावर बोलणारी असावी.गरीब महिला रोजगार, व्यवसाय हा शासनाच्या माध्यमातून कसा मिळतो याची माहिती महिलांना देणारे असावेत.

रेश्मा निलेश ठिकेकर (व्यावसायिक) म्हणाल्या, शैक्षणिक पात्रतेच्या आधारे महिला राजकीय उमेदवारांची निवड असावी.आजच्या काळात राजकारणात महिला उमेदवारांची भूमिका अधिक महत्त्वाची होत आहे. एक महिला उमेदवार म्हणून प्रभावी कामगिरी करण्यासाठी तिला किमान पदवीधर शिक्षण असणे गरजेचे आहे. सार्वजनिक प्रशासन, अर्थशास्त्र किंवा राजकीय शास्त्र यांसारख्या क्षेत्रात ती शिक्षित असल्यास निर्णय घेणे आणि धोरण आखणे अधिक सक्षमतेने होईल. शिक्षण हा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे, त्यामुळे उमेदवारांची निवड करताना तो लक्षात घेणे आवश्यक आहे. उमा राज शेरे निवृत्त प्रयोगशाळा अधिकारी ( महाराष्ट्र शासन ) म्हणाल्या, निवडणुकांमध्ये महिलांना ५०% आरक्षण द्यावे, असे माझे मत आहे. लोकसंख्येचा दृष्टिनेही विचार करता ४८ ते ४९% लोकसंख्या महिलांची आहे आणि फक्त कायद्याद्वारे समानता पुरेशी नसून प्रत्यक्ष संधी मिळणे आवश्यक आहे. राजकारणात आधीपासून समान संधी नाहीत.आरक्षण हे विशेषाधिकार नसून सुधारात्मक पाऊल आहे. महिलांना आरक्षणासाठी शैक्षणिक पात्रता किमान पदवीधर असावी. नेतृत्वगुण, अनुभव यांचा योग्य विचार करणे आवश्यक आहे. राजकीय पक्षांनी कौटुंबिक वर्चस्व टाळावे आणि महिलांना प्रशिक्षण, आर्थिक पारदर्शिता आणि प्रशासकीय मार्गदर्शन दिले पाहिजे. महिला उमेदवाराचे वय ७५ वर्षांपर्यंत असावे .अधिक अनुभव व सामाजिक जाण असावी.

उल्का नारायण तेंडुलकर म्हणाल्या,उमेदवार कशा पाहिजे असा प्रश्न कोणी विचारला तर माझं उत्तर असं असेल तो शिकलेला असला पाहिजे.तसेच सगळ्यांना एकत्र घेऊन काम करणारा पाहिजे. खोटी आश्वासने देऊन पाच वर्षे तोंड दाखवत नाही. त्याना भेटायचे असले तर मधले सगळे माणसं परवानगी घ्यावी लागते. आपली अडचण सांगितली तर हा काम करतो असं बोलून विसरुन जाणारे असतात.त्या पेक्षा असे उमेदवार पाहिजे कि जो प्रत्येक तळागाळापर्यंत जाऊन त्यांच्या अडचणी सोडविणारा पाहिजे.नाहितर ते त्याचे चेले येऊन अडचणी सोडवणारा नको.कारण मत आम्ही तुम्हाला दिले आहे.तुमच्या चेला जर उधार असेल तुम्हाला कशाला वोट द्यायचे.आठवड्यातून एकदा तरी तो उमेदवार प्रत्येक भागात जाऊन लोकांना भेटून त्यांच्या बरोबर बोलणारा पाहिजे. सगळ्या अडचणी नाही.पण थोडे फार तरी अडचणी सोडविल्या पाहिजे. तसेच लोकांना भेटायला येताना हार तुरे घेऊन जी लोक गर्दी करतात.ती नको कारण खरंच ज्यांना जास्त गरज असते.ते वाट बघत बसतात आम्हाला कधी भेटायला मिळणार ते शिकलेला असला कि नीट विचार करुन निर्णय घेऊ शकतात.पाच कमवायचे म्हणून उभा राहणारा नको. ह्या पक्षातुन त्या पक्षात जाणार नको. खर्च ज्याला वाटत आपण देशासाठी व समाजासाठी काहितरी करायला पाहिजे.त्यानीच उभे राहिले पाहिजे.नाहितर पाच वर्षे तोंड दाखवायचे नाही. निवडणुकीच्या वेळेसला हात जोडून मतांची भीक मागायची, निवडणूक आल्यावर नागरिकांना भेटणारच नाही.असे उमेदवार नको आहे. दरम्यान, गृहिणी व नोकरदार महिलांनी निवडणुकीत महिला उमेदवाराबाबत आपले मत व्यक्त करताना या उमेदवारांनी महिलाच्या प्रश्नांवर अधिक भर द्यावाअसे सांगितले आहे.



ठाणे ■ गुरुवार
२५ डिसेंबर २०२५
दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता



# 'मी भिवंडीकर' दिनदर्शिकेचे पोलिस उपआयुक्तांचे हस्ते प्रकाशन



**दै.ठाणेजीवनदीपवार्ता**

**भिवंडी** : भिवंडीतील खबर दर खबर या मिडिया ग्रुप तर्फे बनविण्यात आलेल्या मी भिवंडीकर या दिनदर्शिकेचे नुकतेच भिवंडी पोलिस उप आयुक्त शशिकांत बोराटे यांच्या हस्ते करण्यात आले. यांप्रसंगी माजी आमदार रशीद ताहीर मोमिन,सहाय्यक पोलिस आयुक्त विजय मराठे,सामाजिक कार्यकर्ते के.के दुर्राज,खबर दर खबर मिडीयाचे मुख्य संचालक मुनीर अहमद,उपनिबंधक इंद्रवदन सोनवणे यांच्यासह मान्यवर नागरिक उपस्थित होते.

मी भिवंडीकर या दिनदर्शिकेच्या माध्यमातून भिवंडीतील सर्वधर्मीय स्थळ,इतिहास,व्यवसाय यांची ओळख करून देण्याचा प्रयत्न केल्या बद्दल उपस्थितीत पाहुण्यांनी कौतुक केले. दिनदर्शिका नसत्या तर कोणालाही इतिहास समजला नसता,शिकवता आला नसता असे सांगत कॅलेंडर नसते तर भविष्यातील पूर्वनियोजन करता आले नसते असे मत पोलिस उप आयुक्त शशिकांत बोराटे यांनी व्यक्त करीत जगात आजच्या घडीला दोन हजार वर्षांपूर्वीचे कॅलेंडर कला दालनात उपलब्ध आहे अशी माहिती त्यांनी दिली.

## नाना टिळक प्राथमिक विद्यालयातील आठवडा बाजाराला विद्यार्थी व पालकांचा प्रतिसाद



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : पेण एज्युकेशन सोसायटीच्या वावोशी येथील नाना टिळक प्राथमिक विद्यालयात शालेय विद्यार्थ्यांचा आठवडा बाजार भरविण्यात आला. या आठवड बाजाराचे उद्घाटन वावोशी गोरठण येथील उद्योजिका सौ.सायली सुजितकुमार पिंगळे यांच्या शुभहस्ते फित कापून करण्यात आले. एलआयसी चे विकास अधिकारी सुमित जाधव यांच्या हस्ते श्रीफळ वाढवण्यात आला.यावेळी ग्रामपंचायत सदस्या पुनम भऊड,सी. एफ. आयच्या आरती संदीप म्हात्रे, श्रीकांत चव्हाण, प्रियंका साळुंखे, विकास सहयोग प्रतिष्ठानचे अविनाश दोंदे ,टाटा स्टील फाउंडेशनचे अनंत गायकवाड, संतोष गायकवाड, कांचन सावंत,सुविधा मॅडम अश्विनी गुरव आदी मान्यवर उपस्थित होते.

नाना टिळक प्राथमिक विद्यालयातील पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांचा आठवडा बाजार भरण्यात आला होता त्यात पालकांनी गावातील सर्व महिलांनी मोठा सहभाग घेतला. यामध्ये खाऊचे स्टॉल स्टेशनरी पालेभाज्या फळभाज्या भेल बिस्किटे पकोडे इडली सांबर आदी पदार्थ ठेवण्यात आले होते

या आठवड्या बाजाराबाबत मुख्याध्यापिका विद्या धनाजी घरत यांनी सांगितले की शालेय आठवडा बाजारात विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान, गणितीय संकल्पना आणि खरेदी-विक्रीचे व्यवहार समजावेत म्हणून शाळांमध्ये भरवले जाणारे प्रात्यक्षिक प्रदर्शन असते, जिथे विद्यार्थी स्वतः भाज्या, फळे, स्टेशनरी किंवा इतर वस्तू विकतात आणि खरेदी करतात, ज्यामुळे त्यांना अनुभवजन्य शिक्षण मिळते आणि आत्मविश्वास वाढतो. तसेच या आठवडा बाजारामध्ये शिक्षक विद्यार्थी पालक यांनी उत्तम प्रतिसाद देऊन विद्यार्थ्यांनीआपल्या शालेय जीवनामध्ये अशाप्रकारे चांगला उपक्रम राबवला याबद्दल त्यांचे अभिनंदनही करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका विद्या घरत यांच्या नेतृत्वाखाली शालेय शिक्षक मानसी केदारे सुनील पवार आरती पाटील रिया वालम विद्या शेट्ये सुलभा राजपूरकर रंजना भऊड आदींसह पालक शाळा व्यवस्थापन समिती आजी-माजी पालक यांनी विशेष सहकार्य केले

# राजकीय पक्ष व उमेदवारांनी इलेक्ट्रॉनिक माध्यमातून जाहिरात प्रसारणासाठी पूर्वप्रमाणन करणे आवश्यक

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक 2025-26 मध्ये राजकीय पक्ष व उमेदवार यांच्याकडून प्रचार, प्रसिध्दीकरिता विविध माध्यमांचा वापर होणार आहे. यामध्ये आदर्श आचार संहितेचे पालन व्हावे मा. राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र यांनी जाहीर केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रचार, प्रसार व्हावा याकरिता आयोगाच्या दिनांक 09 ऑक्टोबर 2025 रोजीच्या 'निवडणूकांच्या प्रयोजनार्थ प्रसारमाध्यम संनियंत्रण व जाहीरात प्रमाणन आदेश 2025' या अधिसूचनेनुसार ठाणे महानगरपालिकेच्यावतीने कार्यवाही करण्यात येणार आहे.

या अनुषंगाने सदर अधिसूचनेनुसार महानगरपालिका स्तरीय माध्यम प्रमाणन आणि संनियंत्रण समिती निवडणूक अधिकारी तथा आयुक्त सौरभ राव यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आली आहे. या समितीमध्ये पोलीस आयुक्त किंवा त्यांचे प्रतिनिधी, आचारसंहिता कक्ष प्रमुख तथा परिवहन व्यवस्थापक भालचंद्र बेहरे, उपायुक्त तथा नोडल अधिकारी मिताली संचेती, उपमाहिती जनसंपर्क अधिकारी तथा नोडल अधिकारी प्राची डिंगणकर हे समिती सदस्य आहे.



निवडणूकीमध्ये कोणत्याही राजकीय पक्षास अथवा उमेदवारास दूरदर्शन, उपग्रह वाहिन्या, केवल वाहिन्या, यू टयुच वाहिन्या, केवल नेटवर्क, आकाशवाणी, खाजगी एफ.एम. वाहिन्या, सिनेमागृह, सार्वजनिक ठिकाणचे ऑडिओ व्हिज्युअल डिस्प्ले, ई वृत्तपत्रे, बल्क एसएमएस, व्हॉईस एसएमएस, समाजमाध्यमे, संकेतस्थळे अशा कोणत्याही प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांव्दारे जाहीरात प्रसारित / प्रसिध्द करावयाची असल्यास त्या प्रस्तावित जाहिरातीचे समितीकडून 'पूर्वप्रमाणन' म्हणजे 'प्रसिध्दी अथवा प्रसारणापूर्वी मान्यता घेणे' आवश्यक आहे. पूर्वप्रमाणन केले नसल्यास त्या जाहिरातीचे प्रसारण / प्रसिध्दी करता येणार नाही याची नोंद घ्यावयाची आहे.

जाहिरात पूर्वप्रमाणनासाठी जाहिरात प्रसारित / प्रसिध्द करावयाच्या दिनांकापूर्वी कार्यालयीन कामकाजाच्या किमान 5 दिवस आधी समितीकडे 'परिशिष्ट 4' नुसार अर्ज करावयाचा आहे. सदर अर्ज नमुना प्रत ठाणे महानगरपालिका मुख्यालयात पहिल्या मजल्यावर कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहातील माध्यम निरीक्षण कक्षामध्ये उपलब्ध होईल व ते अर्ज त्याच ठिकाणी आवश्यक कागदपत्रांसह जमा करावयाचे आहेत.

अर्जासोबत प्रसारित करावयाच्या जाहिरातीच्या इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील प्रती या 2 पेन ड्राईव्हमध्ये, राजकीय पक्षाच्या पदाधिका-याने किंवा उमेदवाराने साक्षांकित केलेल्या 2 मुद्रित प्रतींसह (प्रिंट्स) जमा करावयाच्या आहेत. निवडणूकविषयक जाहिरातींवर राजकीय पक्षाने खर्च केला असल्यास त्याचा समावेश पक्षाच्या; तर उमेदवाराने खर्च केलाअसल्यास त्याचा समावेश उमेदवाराच्या निवडणूक खर्चात करणे आवश्यकक आहे. खालील स्वरूपाच्या आशयाचा समावेश असलेल्या जाहिराती प्रसारित / प्रसिद्ध करता येणार नाहीत व अशा स्वरुपाच्या जाहिरातींचे पूर्वप्रमाणनही केले जाणार नाही याची विशेष नोंद घ्यावयाची आहे. यामध्ये -

(क) भारतीय संविधानाची पायमल्ली, केंद्र/ राज्य शासनाच्या कायद्यांचे उल्लंघन,

(ख) राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशांची पायमल्ली,

(ग) धर्म, वंश, जात, लिंग, भाषा, पेहराव इत्यादींच्या आधारे तेढ अथवा शत्रुत्वाची शक्यता,

( घ) प्रार्थना स्थळांचे छायाचित्र / छायाचित्रणाचा समावेश,

(ङ) कायदा व सुव्यवस्थेला आव्हान, हिंसेला प्रोत्साहन, शांततेचा भंग,

(च) न्यायालयाचा अथवा एखाद्या व्यक्ती किंवा संस्थेची बदनामी,

(छ) देशाच्या ऐक्याला, सार्वभौमत्वाला आणि राष्ट्रीय एकात्मतेला बाधा.

(ज) अन्य कुठल्याही देशावर टिका, अवमानजनक टिप्पणी अथवा तिरस्कारपूर्ण विधान,

(झ) संरक्षण दलाच्या अधिकारी / कर्मचारी अथवा संरक्षण दलाचे छायाचित्र / छायाचित्रण,

(ञ) राजकीय पक्ष, राजकीय नेता किंवा अन्य कोणावरही खोटे आरोप,

(ट) कुठल्याही राजकीय नेत्याच्या अथवा व्यक्तीच्या खाजगी आयुष्यात हस्तक्षेप,

(ठ) नीतिमत्ता व सभ्यतेचे उल्लंघन,

(ड) अश्लिलतेला प्रोत्साहन

अशा बाबींचा समावेश आहे. जाहिरात बनविताना व त्या प्रमाणनासाठी पाठविण्यापूर्वी वरील बाबींची खात्री करून घ्यावी. जेणेकरून कालापव्यय होणार नाही असे सूचित करण्यात येत आहे. जाहिरात प्रसारण / प्रसिद्धीसाठी येणा-या खर्चाची सर्व देयके, धनादेश/ धनाकर्ष / ऑनलाईन पद्धतीने अदा करण्यात येतील. कुठल्याही परिस्थितीत ही देयके रोकड स्वरूपात अदा करण्यात येणार नाही. मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेव्यतिरिक्त अन्य भाषेतील प्रस्तावित जाहिरातीचे पूर्वप्रमाणन करण्यासाठी अर्ज सादर करताना

संबंधित भाषेतील जाहिरातीच्या इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील दोन प्रती द्याव्यात, त्याचचरोबर त्या जाहिरात संहितेचा मराठी, हिंदी किया इंग्रजी भाषेत अनुवाद करून राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याने किंवा उमेदवाराने साक्षांकित केलेल्या जाहिरात संहितेच्या दोन मुद्रित प्रती (प्रिंट) जोडाव्यात. त्यासोबत "सदर प्रस्तावित जाहिरातीचा मराठी/ हिंदी / इंग्रजी भाषेत यथार्थ अनुवाद करण्यात आला असून, कोणत्याही चुकांकरिता अर्जदार जबाबदार असेल, असे निश्चयपूर्वक कथन करण्यात येत आहे." असे नोटराईज्ड प्रतिज्ञापत्र 'परिशिष्ट- 5' प्रमाणे सादर करणे आवश्यक असेल.

प्रस्तावित जाहिरात पूर्वप्रमाणनाचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर तो कार्यालयीन कामकाजाच्या ३ दिवसांच्या आत संबंधित समिती निकालात काढेल. अर्ज निकाली काढताना समिती, जाहिरातीचा कोणताही भाग वगळेल अथवा फेरबदल करेल किंवा दुरूस्ती सूचवेल त्यानुसार कार्यवाही करणे संबंधित राजकीय पक्ष उमेदवार/ अर्जदारावर बंधनकारक असेल.

प्रस्तावित जाहिरातीचे संबंधित समितीने पूर्वप्रमाणन केले नसल्यास, अशा जाहिरातीचे प्रसारमाध्यमांना प्रसारण / प्रसिद्धी करता येणार नाही.

ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025-26 ही दि. 15 जानेवारी 2026 रोजी होत असून या निवडणूका मुक्त, निर्भय, पारदर्शक, निःपक्षपातीपणे पार पडण्याकरीता सर्व माध्यमांवर जाहिरात प्रसारण, प्रसिध्दी व प्रचार याबाबत मा. राज्य निवडणूकाने निश्चित केलेल्या कार्यपध्दतीचे राजकीय पक्ष व उमेदवार तसेच प्रचार प्रसिध्दी करणा-या सर्व प्रसार माध्यमांनी पालन करावे असे आवाहन करण्यात येत आहे.

## गिरीधर पिंगळे गुरुजी यांचा द्रोणागिरी भूषण पुरस्काराने सन्मान



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : आदर्श शिक्षक गिरीधर पिंगळे गुरुजी यांनी शैक्षणिक सामाजिक क्षेत्रामध्ये केलेल्या अतुलनीय कामगिरीमुळे द्रोणागिरी भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

सन२०२५ मध्ये उरण येथील द्रोणागिरी स्पोर्टस असोसिएशच्या पंचविसाव्या महोत्सवात पुरस्काराचे वितरण उरणचे माजी आमदार मनोहरशेठ भोईर काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष महेंद्र घरत त्याचबरोबर असोसिएशनचे अध्यक्ष महादेव घरत उपाध्यक्ष मनोज पडते खजिनदार शिवेंद्र म्हात्रे सचिव दिलीप तांडेल क्रीडा प्रमुख भरत म्हात्रे महिला प्रमुख वैशाली घरत आदी मान्यवरांच्या शुभहस्ते द्रोणागिरी भूषण पुरस्कार गिरीधर पिंगळे गुरुजी यांना देण्यात आले.पुरस्कारामध्ये मेडल शाल मानपत्र ,पुष्पगुच्छ असे होते.

गिरीधर पिंगळे गुरुजी यांनी आज पर्यंत केलेल्या वेगवेगळे पुस्तक संग्रह काव्यसंग्रह विविध स्फूटलेखन कविता यासह शैक्षणिक क्षेत्रामध्ये केलेले कार्य अतुल्य असल्यामुळे त्यांचा गौरव करण्यात आला

# सार्वत्रिक निवडणूकीबाबत उल्हासनगर महानगरपालिकेची पत्रकार परिषद

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**उल्हासनगर** : उल्हासनगर महानगरपालिकेच्या मा. प्रशासक तथा आयुक्त श्रीम. मनिषा आव्हाळे भा.प्र.म. याचे अध्यक्षतेखाली दिनांक २२/१२/२०२५ रोजी "पत्रकार परीषद" आयोजित करण्यात आली.

सदर पत्रकार परिषदेत उल्हासनगर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम २०२५-२६ बाबत श्री. गणेश शिंपी, निवडणूक विभाग प्रमुख व श्री. किरण भिलारे, मुख्य लेखा अधिकारी यांनी माहिती दिली. त्यामध्ये अनुक्रमे नामनिर्देशपत्र देण्याचा कालावधी, नामनिर्देशनपत्रे स्विकारण्याचा कालावधी, नामनिर्देशनपत्रांची छाननी, वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्दी, आचारसंहितेचा कालावधी, जाहीर प्रचाराचा कालावधी, उमेदवाराचा निवडणूक खर्चाची मर्यादा, महापालिकेने निवडणुक खर्चासाठी केलेली तरतूद, निवडणूकीसाठी नियुक्त कर्मचाऱ्यांची संख्या, विविध समित्यांची स्थापना, निवडणूक निर्णय अधिकारी यांची माहिती, मतदान केंद्रांची माहिती, एकूण जागांचा तपशील (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, सर्वसाधारण), प्रभागनिहाय आरक्षणाचा तपशिल, प्रभागनिहाय मतदारांचा तपशिल याबाबत माहिती देण्यात आली.

तसेच निवडणू खर्चाबाबत कायदेशीर तरतूद, निवडणूक सुधारित खर्चाची मर्यादा, खर्चाचे पक्रार आणि नोंदणी, दक्षतापथक, राजकीय पक्ष आणि स्टार प्रचार यांनी केलेला खर्च, पेडन्यूज, हिशेव सादर करण्याची प्रक्रिया, नियमाचे उल्लंघन परिणाम, खर्चाचे महत्वाचे टप्पे आणि मुदती, सोशल मीडिया आणि डिजिटल खर्च, खर्च निरीक्षकाची भुमिका, नमुना खर्चाची सत्यता पडताळणी (शपथपत्र), उमेदवार खर्च पडताळणी, उमेदवारांना निवडणूक खर्च भरण्यासाठीचे विविध नमुने इत्यादी मुद्यांवर चर्चा करून माहिती देण्यात आली.

अतिरिक्त आयुक्त श्री. किशोर गवस यांनी आचारसंहिता नियमावलीबाबत माहिती दिली. निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय व निवडणूक प्रक्रियेच्या संवेदनशील ठिकाणी मोबाईल वापरण्यास परवानगी नसल्याचे सांगण्यात आले.

पत्रकारांनी उपस्थित केलेल्या मुद्यांचा निवडणूक अधिकारी तथा आयुक्त श्रीम. मनिषा आव्हाळ भा.प्र.से. यांनी खुलासा करून निवडणूक प्रक्रिया, एक खिडकी योजना, पोलिस यंत्रणा, प्रचार सभा, प्रचार रॅली, दिव्यांग मतदार व्यवस्था याबाबत माहिती दिली. सर्व निवडणूक कार्यालयांत पुरेसे मनुष्यबळ. इन्वर्टर, स्टेशनरी, स्ट्राँगरूम व कॉऊंन्टिगची व्यवस्था, रॅम्प, शौचालय, शेड, विद्युत व्यवस्था इ. सुविधा पुरवित असल्याचे व कायदा-सुव्यवस्थेबाबत मानक कार्यप्रणाली (SOP) तयार करणे, मतदार जनजागृती करण्यात येत असल्याची माहिती दिली. "पत्रकार" हा लोकशाहीचा एक मुख्य आधारस्तंभ असून, निवडणूक प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी सर्व पत्रकार बंधूंनी सहकार्य करावे, अशी विनंती निवडणूक अधिकारी तथा आयुक्तांनी पत्रकारांना केली.

सदर "पत्रकार परिषदेस" श्रीम. मनिषा आव्हाळे भा.प्र.से., निवडणूक अधिकारी तथा आयुक्त. श्री. किशोर गवस, अतिरिक्त आयुक्त, निवडूक निर्णय अधिकारी श्री. बाळासाहेब तिडके, श्री. गणेश सांगळे, श्री. विशाल जाधवर, श्री. विजयकुमार वाकोडे, श्री. मुकेश पाटील, श्री. संजय शिंदे तसेच श्रीम. विशाखा मोटघरे, उपआयुक्त (निवडणूक), श्रीम. स्नेहा करपे, उपआयुक्त, श्री. किरण भिलारे, मुख्य लेखा अधिकारी, श्री. अजय साबळे, सहा. आयुक्त तथा जनसंपर्क अधिकारी, श्री. गणेश शिंपी, निवडणूक विभाग प्रमुख व इतर अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

## मुरबाड तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी खुशखबर



### प्रोत्साहनपर राशी (बोनस ) बँक खात्यात जमा होण्यास सुरुवात!

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड(दिलीप पवार)**: मुरबाड तालुका शेतकरी सहकारी संघाने भात खरेदी हंगाम सन 2024-25 सालात ज्या शेतकऱ्यांची भातविक्रीसाठी ऑनलाईन नोंदणी केली होती अशा 2994 शेतकऱ्यांच्या थेट बँक खात्यात बोनस जमा होण्यास सुरवात झाली असल्याची माहिती खरेदी विकी संघाचे प्रशासकीय चेअरमन संतोष पवार यांनी दिली.

मुरबाड विधानसभेचे आमदार किसन कथोरे यांनी शेतकऱ्यांना लवकरात लवकर बोनस मिळावा यासाठी शासन दरबारीं विशेष प्रयत्न केले असून एकूण 2994 शेतकऱ्यांचे 7, 26, 96,198(सात कोटी सव्विस लाख शहान्नव हजार एकशे अठ्ठ्यानव रूपये) इतकी बोनस रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार असल्याने तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी मोठी आनंदाची गोष्ट असल्याचे चेअरमन संतोष पवार यांनी सांगितले. तसेच लवकरच खरेदी विक्री संघाकडून या वर्षाची भात खरेदी सुरू होणार असल्याचे सांगून आमदार किसन कथोरे साहेब हे सदैव शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहत असल्यामुळे संतोष पवार व सर्व प्रशासकीय संचालक मंडळ सदस्यांनी आमदार किसन कथोरे यांचे जाहीर आभार मानले आहेत.

# पडघ्यातील कुंभेरी नदी प्रदूषणाच्या विळख्यात

## पडघा परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पडघा** : भिवंडी तालुक्यातील पडघा परिसरातील गांवाचें मुख्य जलस्रोत व भातसा नदीची उपनदी असलेल्या कुंभेरी नदी प्रदूषणाच्या विळख्यात सापडली असल्याने परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

पडघा, राहुर, डोहोळे ग्रामपंचायत हद्दीतून वाहणारी कुंभेरी, नदीत परिसरातील कचरा, विवीध अस्थानातील सांडपाणी, नदीत मिसळल्यामुळे नदीच्या पाण्यावर हिरवा तवंग दिसून येत आहे.हिरवा तवंग नक्की कोणत्या कारणाने निर्माण झाला आहे.तसेच नदीतील पाणी पूर्णतः दूषित का झाले आहे असा सवाल नागरिक विचारीत आहेत. पाण्याच्या पृष्ठभागावर हिरवा तवंग आणि शेवाळ साचल्याचे व नदीत पडणाऱ्या कचरा, निर्माल्य, प्लॅस्टिक पिशव्यामुळे परिणामस्वरूप नदीचे पाणी गंभीर प्रदूषणाच्या विळख्यात सापडले असून कुंभेरी नदीकडे प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे स्थानिक नागरिकांनी व प्रसारमाध्यमांनी वारंवार आवाज उठवूनही प्रदूषण रोखण्याबाबत कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नसल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे.

कुंभेरी नदी ही परिसरातील अनेक गावांच्या पाणीपुरवठ्याचे प्रमुख साधन आहे.भाजीपाला उत्पादन, शेती, मासेमारीतुन आदिवासी बांधवांचा उदरनिर्वाह या नदीवर अवलंबून आहे. तसेच नदीकिनारी असलेल्या प्रसिद्ध कुंभेरेश्वर महादेव मंदिरामुळे या नदीला धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व आहे. दरवर्षी शिवरात्री महोत्सवासाठी हजारो भाविक येथे दर्शनासाठी येतात. पडघा ग्रामपंचायतीने लाखो रुपये खर्च करून गणेश घाट, पथदिवे व विसर्जन व्यवस्था केली असली तरी नदीची बिकट स्थिती झाली असुन सातत्याने नदीची प्रदुषणाकडे वाटचाल सुरू असल्याने नागरिकांनी नदीकाठाकडे पाठ फिरवल्याचे दिसत आहे. तरी स्थानिक ग्रामपंचायत, जिल्हा प्रशासन, जलसंपदा पाठबंधारे विभाग, प्रदुषण नियंत्रण मंडळ, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी लक्ष घालून कुंभेरी नदी प्रदुषणाच्या विळख्यातून वाचवावी अशी मागणी परीसरातुन होत आहे. शेतीतील रसायने, औद्योगिक सांडपाणी, गोठ्यातील मलमूत्र यामुळे नदीत सूक्ष्म पोषक द्रव्यांचे प्रमाण वाढले आहे.नदीची रुंदी कमी होणे, पाण्याचा प्रवाह घटणेही प्रदूषणाला कारणीभूत ठरले आहे. हानीकारक शेवाळ वाढीमुळे सूक्ष्म पोषक वाढल्यामुळे ,रसायनमुळे ऑक्सिजनचा पूरवठा कमी होऊन पार्किन्सन, गॅस्ट्रोइंटेस्टाइनल विकार, किडनी विकार सारखे रोग होतात. यामुळे सांडपाणी व्यवस्थापन आणि कचरा नियोजनाचा प्रकल्प अहवाल संबंधित विभागाकडे जमा करण्यात आला आहे. असे जलनायक डॉ. स्नेहल दोंदे यांनी सांगितले तर पाण्यात नायट्रोजन व फॉस्फरसचे प्रमाण वाढल्याने शेवाळाचा फैलाव होतो. यामुळे नदीतील ऑक्सिजन कमी होऊन जलचर मृत्यूमुखी पडतात.पाणी दूषित होऊन भूजल पुनर्भरणावर परिणाम होत आहे. प्रदूषण रोखण्यासाठी मानवी हस्तक्षेप कमी करणे आणि नदीची नियमित स्वच्छता आवश्यक असल्याचे पर्यावरण तज्ञ डॉ. दिलीप काकावीपुरे यांचे मत आहे.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024